# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २१-२३ दिनांक २३/०१/२०२३

## पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या विविध गुन्हयातील १,०७,५१,९८०/- रुपयांचा हस्तगत मुद्देमाल पिडीत व फिर्यादी यांना मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते करण्यात आला परत.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ हद्दिमधील काशिमिरा, मिरारोड, नवघर, नयानगर, भाईंदर व उत्तन या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या २०२२ व २०२३ मधील विविध ५१ गुन्हयांतील हस्तगत केलेला एकुण १,०७,५१,९८०/- रुपयांचा मुद्देमाल मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांच्या हस्ते आज दिनांक २३/०१/२०२३ रोजी पिडीत व फिर्यादी यांना परत करण्यात आला आहे. पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्हयांची पोलीसांनी कौशल्यपुर्वक उकल करुन फिर्यादी यांचा आरोपीतांनी चोरुन किंवा जबरीने नेलेल्या किंमती वस्तू तसेच रोख रक्कम गुन्हयाचे तपासादरम्यान हस्तगत करण्याल आले होते. सदर गुन्हयांमध्ये पोलीसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये ३ चारचाकी वाहने, ३ ऑटोरिक्षा, ८ मोटारसायकल, १५ मोबाईल हॅन्डसेट, सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे.

आज दिनांक २३/०१/२०२३ रोजी सायंकाळी ६:३० वाजताच्या दरम्यान शहनाई हॉल, कनकिया रोड, मिरारोड पुर्व जि. ठाणे येथे घेण्यात आलेल्या मुद्देमला हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान पिडीतांना उपरोक्त मुद्देमाल पोलीसांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन परत मिळवून दिल्याने संबंधित पिडीत व फिर्यादी यांनी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे आभार मानून आनंद व्यक्त केला आहे.

सदर मुद्देमला हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयाचे मा. श्री. मधुकर पाण्डेय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ १ व इतर पोलीस अधिकारी अंमलदार व नागरिक उपस्थित होते.


परिमंडळ १ मिरारोड
आयोजित
मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रम
शुभहस्ते


मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
परिमंडळ १ मिरारोड
आयोजित
मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रम
शुभहस्ते

**--------000--------**